विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित

आणि

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

# महिला कला-वाणिज्य महाविद्यालय

## चांदूर रेल्वे, जि. अमरावती

(नॅक द्वारा 'ब' श्रेणी प्रमाणित-वर्ष २०१८)

# माहिती पत्रक

Web : www.macccr.org

ऑनलाईन प्रवेशासाठी संकेतस्थळ

http://www.admissionform.info/

# विद्यापीठ गीत

विद्या चिंतन । विद्या मंथन
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।

जनमन जगर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगेबाबा तुमचे स्वप्न पूर्ण झाले ।।

कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।। १ ।। जनमन ...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरून, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओलाव्याने, मानस मोहरले ।। २ ।। जनमन ...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यान्‌पिढ्यांचे जीवनदर्शन विश्वात्मक झाले ।। ३ ।। जनमन ...

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती

## ❋ संस्थेचे पदाधिकारी ❋

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. नितीन रामदास धांडे | अध्यक्ष |
| २. | मा. ॲड्. उदय शशिकुमारजी देशमुख | उपाध्यक्ष |
| ३. | मा. प्रा. डॉ. हेमंत मुरलीधर देशमुख | कोषाध्यक्ष |
| ४. | मा. श्री. युवराजसिंग वसंतराव देशमुख | सचिव |
| ५. | मा. श्री. शंकरराव काळे | सदस्य |
| ६. | मा. श्री. नितीन बाबुरावजी हिवसे | सदस्य |
| ७. | मा. प्रा. सौ. रागिणी हेमंतराव देशमुख | सदस्य |
| ८. | मा. डॉ. सौ. वैशालीताई धांडे | सदस्य |
| ९. | मा. प्रा. डॉ. सौ. पूनमताई चौधरी | सदस्य |

## ❋ महाविद्यालय विकास समिती ❋

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. नितीन रामदास धांडे | अध्यक्ष (अध्यक्ष, वि.यु.वे.सो.अम.) |
| २. | मा. श्री. युवराजसिंग वसंतराव देशमुख | सचिव (सचिव, वि.यु.वे.सो.अम.) |
| ३. | मा. डॉ. हेमंत मुरलीधर देशमुख | सदस्य (प्रतिनिधी–संशोधन क्षेत्र) |
| ४. | मा. श्री. नितीन बाबुरावजी हिवसे | सदस्य (प्रतिनिधी–औद्योगिक क्षेत्र) |
| ५. | मा. ॲड्. उदय शशिकुमार देशमुख | सदस्य (प्रतिनिधी–समाजसेवा क्षेत्र) |
| ६. | डॉ. सीमा संजय जगताप | पदसिद्ध सचिव/प्राचार्य |
| ७. | प्रा. डॉ. अशोक नामदेवराव पळवेकर | सदस्य (विभागप्रमुख) |
| ८. | प्रा. डॉ. सीमा संजय जगताप | सदस्य (महिला प्रतिनिधी) |
| ९. | प्रा. डॉ. विजय दलपतराव कापसे | सदस्य (IQAC प्रतिनिधी) |
| १०. | प्रा. डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ११. | | सदस्य (शिक्षकेतर प्रतिनिधी) |
| १२. | श्री. संदीप शालीकराम झोडे | सदस्य (शिक्षकेतर प्रतिनिधी) |
| १३. | | सदस्य (प्रतिनिधी औद्योगिक क्षेत्र) |

# संस्थेविषयी....

सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती या शैक्षणिक संस्थेची स्थापना १९६५ साली करण्यात आली.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उदात्त हेतूने प्रेरित होऊन या संस्थेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शहरात राहून शिक्षण घेता यावे म्हणून पहिल्या निवासी छात्रालयाची अमरावती येथे स्थापना केली ; आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी पार पाडण्यासाठी छोटी पण सुनिश्चित अशी सुरुवात करून आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची निकड लक्षात घेता शिक्षण प्रसाराच्या पहिल्या कालखंडात संस्थेने विविध ठिकाणी विद्यालये, विज्ञान महाविद्यालये आणि कला व वाणिज्य महाविद्यालये स्थापन केलीत. त्यानंतरच्या काळात अभियांत्रिकी महाविद्यालये, दंत महाविद्यालय व तंत्रनिकेतन आणि कला व वाणिज्य महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली.

महिलांकरीता उच्च शिक्षणाची निकड लक्षात घेता दोन महिला महाविद्यालये सुद्धा स्थापन करण्यात आलीत, जी आज उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत.

५४ वर्षांपूर्वी पेरलेल्या शिक्षण प्रसाराच्या बियांचे महत्‌कष्टाने प्रथमत: इवल्याशा रोपट्यात आणि आता विस्तीर्ण डेरेदार वृक्षात रुपांतर झाल्याचे संस्थेच्या रुपात पहावयास मिळत आहे.

संस्थेच्या वरिष्ठ सदस्यांनी आखून दिलेल्या ध्येय धोरणाप्रमाणे व संस्थेस प्राप्त करून दिलेल्या नावलौकिकाप्रमाणे संस्थेची नवीन कार्यकारिणी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या सक्षम व प्रतिभाशाली नेतृत्वाखाली वाटचाल करीत आहे.

ग्रामीण विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची संधी सहज उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने १९९१ साली विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रेरणेने व सहकार्याने चांदुर रेल्वे येथे महिला कला- वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

पदवीपर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था असलेल्या या महाविद्यालयातील विद्यार्थिनींना पुढे पदव्युत्तर शिक्षणाची समस्या होती. ही समस्या लक्षात घेऊन महाविद्यालयाने शैक्षणिक सत्र २००४-२००५ पासून एम. ए. मराठी व सत्र २००८-२००९ पासून एम. ए. गृहअर्थशास्त्र हे विषय महाविद्यालयात सुरू केले. पुढे पदव्युत्तर शिक्षणानंतर मराठी व इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवीसाठी संशोधन केंद्राची मान्यता मिळवण्यात आली.

अनुसूचित जाति-जमाती व मागासवर्गीय विद्यार्थिनींकरीता तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थिनींकरीता विशेष शिकवणीवर्ग आणि प्रज्ञावंत विद्यार्थिनींकरीता महाविद्यालयात तज्ज्ञ प्राध्यापकांकडून विशेष मार्गदर्शन दिले जाते. अनेक विद्यार्थिनी या योजनांचा लाभ घेत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना छोट्याछोट्या गावांतून महाविद्यालयात येताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. बरेचदा केवळ बसेसची सुविधा नाही या कारणामुळे विद्यार्थिनींच्या समस्या विचारात घेऊन महाविद्यालयाच्या परिसरात प्रशस्त आणि सर्व सुविधांनी युक्त अशा वसतिगृहाची निर्मिती करण्यात आली आहे, जेणेकरून वसतिगृहात राहून विद्यार्थिनी आपले शिक्षण पूर्ण करू शकतील.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या हिताचा विचार करून अनेक योजना महाविद्यालयात राबविण्याचा संस्थेचा मानस आहे.

# VISION

To empower girls and women in rural specific with knowledge and confidence in the rouse of globalization to define the future of India through qualitative and enriching women education.

# MISSION

To enable all girls and women students to put in mind intelectually, morally, socially, ethically and economically responsible for becoming good citizens endowed with positive attitude required to enrich personal and social growth.

# GOAL

The goal of  the centre is to provide equal opportunities to students belonging to backward and deprived classes. It has been observed that many students belonging to backward and deprived classes are unable to take higher education and ICT training and skill  development training due to lack of financial resources.

# महिला कला, वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे, जि. अमरावती.

## * प्राध्यापक वृंद *

| विभाग व प्राध्यापकांचे नांव | पदनाम | विभाग | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| डॉ. सौ. एस. एस. जगताप | प्रभारी प्राचार्य/साहा. प्राध्यापक | इंग्रजी विभाग | एम. ए. (इंग्रजी), एम. फिल, पीएच.डी. |
| डॉ. व्हि. डी. कापसे | साहाय्यक प्राध्यापक | अर्थशास्त्र विभाग | एम. ए. (अर्थ.), पीएच.डी. |
| डॉ. जी. एस. वेले | सहयोगी प्राध्यापक | समाजशास्त्र विभाग | एम. ए. (समाज.), पीएच.डी. |
| डॉ. पी. पी. दंदे | साहाय्यक प्राध्यापक | राज्यशास्त्र विभाग | एम. ए. (राज्य.), पीएच.डी. |
| डॉ. ए. एन. पळवेकर | प्राध्यापक | मराठी विभाग | एम. ए. (इंग्रजी), एम.ए. (मराठी) बी.एड्, सेट, एम.फिल., पीएच.डी. |
| श्री. एस. व्ही. भुयार | साहाय्यक प्राध्यापक | भुगोल विभाग | एम.ए. (भुगोल), बी.एड्., एम.फिल. |
| सौ. अनिता एस. धुर्वे | साहाय्यक प्राध्यापक | गृहअर्थशास्त्र विभाग | एम.ए. (गृहअर्थशास्त्र), सेट |
| | ग्रंथपाल | ग्रंथालय | |

## * शिक्षकेतर कर्मचारि वर्ग *

| कर्मचाऱ्याचे नांव | | पद |
|---|---|---|
| श्री. एस. एस. झोडे | – | अधीक्षक |
| ----------- | – | मुख्य लिपिक |
| कु. आर. डी. वघवे | – | शिपाई |
| श्री. ए. डी. शास्त्रकार | – | चौकीदार |
| श्री. ए. पी. गव्हाळे | – | शिपाई |
| श्रीमती आर. के. मेश्राम | – | शिपाई |

# विविध उपक्रम

महाविद्यालयात शैक्षणिक सत्राच्या आरंभी मराठी व इंग्रजी वाड्.मय मंडळ, गृहअर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व भूगोल इत्यादी विषयांच्या अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात येते. त्यानंतर वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन करण्यात येवून त्याप्रमाणे कार्यक्रम राबविले जातात.

उदा. विविध विषयावरील कार्यशाळा, मानव संसाधन मंत्रालय अंतर्गत शब्दावली आयोग, नवी दिल्ली द्वारा दोन दिवसीय कार्यशाळाचे महाविद्यालयातर्फे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. तज्ज्ञांची व्याख्याने तसेच विषयाशी संबंधित सर्वेक्षण विविध कारखान्यांना भेटी, अभ्यास सहल इ. उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा विद्यार्थिनी ज्ञानसंपन्न व प्रतिभाशाली तसेच कर्तृत्ववान व्हाव्यात यादृष्टीने प्रयत्न केला जातो.

### * राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे नियमित व विशेष शिबीरांतर्गत विद्यार्थीनींनीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना व सामुहिक सेवेची वृत्ती रुजविण्याचा तसेच त्यांच्यात नेतृत्वाचे गुण विकसित करण्याचा व त्याव्दारे त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

### * क्रीडा विभाग

विद्यार्थिनींचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकास साधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने शारीरिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. बॅडमिंटन, क्रिकेट, व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी अशा विविध प्रकारच्या खेळांचा सराव करण्याकरीता विद्यार्थिनींना प्रोत्साहीत केले जाते.

### * स्नेहसंमेलन/सांस्कृतिक कार्यक्रम

विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाला विकसित करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने महाविद्यालयात वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच वार्षिक स्नेह संमेलन आयोजित केले जाते.

### ❋ शैक्षणिक सहल

विद्यार्थिनींना देशाची व राज्याची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक माहिती व्हावी, प्रवासातून सहजीवनाचा आनंद लुटता यावा व त्यांच्या ज्ञानात भर पडावी या हेतुने महाविद्यालयात दरवर्षी राज्यांतर्गत तसेच राज्याबाहेर शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते. प्रवासभाड्यात रेल्वेची सवलत प्राप्त होत असल्यामुळे विद्यार्थिनींना सवलतीच्या दरातच सहलीची सुवर्णसंधी प्राप्त होते.

### ❋ ग्रंथालय

ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेचे हृदय म्हणून संबोधले जाते. महाविद्यालयाचे ग्रंथालय हे ग्रंथांनी सुसज्ज आहे. विद्यार्थीनींना उपयुक्त वाचन सामुग्री उपलब्ध आहे. ज्ञानसंवर्धन व अद्ययावत माहितीयुक्त ग्रंथांचा समावेश ग्रंथालयात आहे. त्याचबरोबर निवडक नियतकालिके आणि वर्तमानपत्रे यांची सोय ही ग्रंथालयात करण्यात आली आहे.

विद्यार्थी संख्येनुसार नवीन क्रमिक पुस्तके आणि संदर्भग्रंथांची उपलब्धता नियतकालिकांच्या संख्येत वाढ, विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्याच्या दृष्टीने रोजगार मार्गदर्शन, सामान्यज्ञान स्पर्धा, थोर महात्म्यांची जयंती व पुण्यतिथी यांसारखे विविध उपक्रम ग्रंथालयाच्यावतीने राबविण्यात येतात.

### ❋ वार्षिकांक

महाविद्यालयाचे मुखपत्र असलेला ‘प्रियदर्शनी’ वार्षिकांक हा महाविद्यालयाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. विद्यार्थिनींच्या सुप्त वाड्.मयीन गुणांना वाव देण्यासाठी हे प्रभावी व परिणामकारक माध्यम आहे. या अंकाचे संपादन, वितरण आणि प्रकाशन या तीनही बाबतीत विद्यार्थिनींचाच सहभाग असून ‘प्रियदर्शनी’ हा वार्षिकांक मुद्रित स्वरुपात प्रकाशित होत असतो.

## महिला वसतिगृह

सन २०२१-२०२२ पासून प्रवेश देणे सुरु आहे.

प्रवेश मर्यादा - ६० महिला/विद्यार्थिनी

प्रवेशासाठी कार्यालयात संपर्क साधावा.

# एच.एस.सी. नंतरचा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थिनींना भारत सरकारची शिष्यवृत्ती

**✻ महत्त्वाची सूचना**

अनुसूचित जाति–जमाती व भटक्या अन्य जाती आणि मागासवर्गीय विद्यार्थिनींना त्यांच्या बारावीनंतरच्या अभ्यासक्रमासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती संचालक, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत दिली जाते. खालील अपवाद वगळता इतर मागासवर्गीय विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

विद्यापीठीय गुणवत्ताप्राप्त बी. ए. भाग १ च्या विद्यार्थिनींकरीता शिष्यवृत्ती

**खालील विद्यार्थिनी शिष्यवृत्तीसाठी अपात्र राहतील :**

१. एक व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून दुसरा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थिनीला शिष्यवृत्ती मिळणार नाही.
(उदा. डी.एड्. झाल्यावर बी. ए. ला ॲडमिशन घेणाऱ्या विद्यार्थिनी)

२. वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थिनीस शिष्यवृत्ती मिळणार नाही.

३. समान अभ्यासक्रमाला पुन्हा शिष्यवृत्ती मिळणार नाही.

४. ज्या विद्यार्थिनींच्या पालकाचे सर्व साधनांपासून मिळणारे मासिक उत्पन्न १,५०,०००/– रु. चे वर असेल अशा विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळणार नाही.

५. माध्यमिक शिक्षक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नि:शुल्क शिक्षण.

**❋ प्रवेशविषयक महत्त्वाच्या सूचना**

१. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश घेण्याची अंतिम तारीख म्हणून जाहीर केलेल्या तारखेनंतर प्रवेश मिळणार नाही.

२. प्रवेश अर्जात आवश्यक ती माहिती काळजीपूर्वक भरली नाही तर अर्ज नामंजूर होण्याची शक्यता आहे.

३. विद्यार्थी सहाय्यता निधीतून मदत मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी विशिष्ट प्रपत्रांसह प्राचार्यांकडे अर्ज करावेत.

४. विद्यापीठाने वेळोवेळी पाठविलेली माहिती व नियम या माहिती पत्रकात दिलेली आहे. नवीन येणारी माहिती सूचनांद्वारे वेळोवेळी कळविण्यात येईल.

५. ज्यांना अस्थाई प्रवेश मिळाला असेल अशा विद्यार्थिनींनी ताबडतोब योग्य ती माहिती कार्यालयात देवून आपला प्रवेश नियमित करून घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास पुढील परिणामांची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही.

६. प्रवेश मिळताच विद्यार्थिनीस शिक्षण शुल्काचा पहिला हप्ता ताबडतोब भरावा लागेल. १५ तारखेला सुट्टी असल्यास ते शुल्क १४ तारखेपर्यंत भरावे लागेल. काही आर्थिक अडचणीमुळे त्या महिन्यात शिक्षण शुल्क भरणे शक्य नसल्यास त्याप्रमाणे अर्ज करून पुढे शुल्क भरण्याबद्दल प्राचार्यांची अनुमती घ्यावी.

७. सत्राच्यामधेच महाविद्यालय सोडून गेल्यास पूर्ण सत्राची फी वसूल करण्याचा अधिकार प्राचार्यांनी राखून ठेवला आहे.

८. विद्यार्थिनींच्या गैरवर्तणुकीकरीता तिला महाविद्यालयातून निष्कासित करण्याचा अधिकार प्राचार्यांनी राखून ठेवला आहे.

९. विद्यापीठ परीक्षेस प्रथम बसणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना नामांकन अर्ज भरणे आवश्यक आहे.

१०. महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थिनींची ७५% च्या वर उपस्थिती अनिवार्य आहे. अन्यथा, कोणतीही शिष्यवृत्ती अथवा सवलत मिळणार नाही.

११. विद्यार्थिनींना महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशात रोज महाविद्यालयात येणे अनिवार्य आहे.

## ❊ शिष्यवृत्ती

सर्व मागासवर्गाच्या व कमी उत्पन्न गटाच्या वर्गात मोडणाऱ्या विद्यार्थिनींना भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालयामार्फत जून महिन्यात अर्ज करावा. अपूर्ण किंवा खोटी महिती दिल्यास त्या विद्यार्थिनीस शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविले जाईल. ज्यांच्या शिक्षणात खंड (गॅप) पडला असेल त्यांनी त्या काळात ती काय करीत होती यासंबधीचे कोर्टाचे ॲफिडेव्हिट देणे आवश्यक आहे.

## ❊ अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव प्रवेश ❊

| | | |
|---|---|---|
| १. | अनुसुचित जाती व नवबौद्ध | १३ टक्के |
| २. | अनुसूचित जमाती | ०७ टक्के |
| ३. | विभक्त जमाती (१४ तत्सम जाती) | ०३ टक्के |
| ४. | भटक्या जमाती (जाने. १९९० पूर्वीच्या २८ तत्सम जाती) | २.५ टक्के |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जाती) | ३.५ टक्के |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | ०.२ टक्के |
| ७. | इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| ८. | विशेष मागासवर्गीय प्रवर्ग | ०.२ टक्के |

## ❊ ओळखपत्र

प्रवेश मिळाल्यावर १० दिवसांच्या आत आपले ओळखपत्र तयार करून त्यावर प्राचार्यांची सही घेणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींनी ओळखपत्रासाठी आपला पासपोर्ट साईजचा फोटो प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयात द्यावा लागेल. प्रत्येक विद्यार्थिनीजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. वाचनालयातील पुस्तक, मासिक व इतर सोयी ओळखपत्राच्या आधारावरच दिल्या जातील. तसेच विद्यापीठ व बोर्डाच्या परीक्षेसाठी ओळखपत्र आवश्यक राहील. महाविद्यालयात सुद्‌धा प्रत्येकाने ओळखपत्र सोबत बाळगावे.

# पदवी अभ्यासक्रम

## वाड्.मय विद्याशाखा (Faculty of Arts)

## (बी. ए. भाग-१, २ व ३)

**वाङ्मय स्नातक – बी. ए. भाग-१** **विषय कोड**

| | | |
|---|---|---|
| **अ) अनिवार्य विषय** | १. इंग्रजी | १००१ |
| | २. मराठी | १०११ |

**ब) ऐच्छिक विषय (कोणतेही तीन)**

| विषय | विषय कोड | विषय | विषय कोड |
|---|---|---|---|
| १) अर्थशास्त्र | १०२२ | ४) मराठी वाङ्मय | १०५२ |
| २) समाजशास्त्र | १०२४ | ५) भूगोल | ११११ |
| ३) राज्यशास्त्र | १०२५ | ६) गृहअर्थशास्त्र | १११३ |

**सूचना :** सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार बी. ए. भाग-१, २ व ३ ला सेमिस्टर पद्धती लागू झालेली आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा घेण्यात येतील.

**वाङ्मय स्नातक – बी. ए. भाग-२**

**अ) अनिवार्य विषय** – १. इंग्रजी, २. मराठी, ३. पर्यावरण

* बी. ए. प्रथम वर्षाच्या परीक्षेसाठी घेतलेले विषय बी. ए. भाग-२ साठी कायम राहतील

| | | |
|---|---|---|
| १) अर्थशास्त्र | २) समाजशास्त्र | ३) राज्यशास्त्र |
| ४) मराठी वाङ्मय | ५) भूगोल | ६) गृहअर्थशास्त्र |

**वाङ्मय स्नातक – बी.ए. भाग-३**

**अ) अनिवार्य विषय** – १. इंग्रजी, २. मराठी

* बी.ए. द्वितीय वर्षाच्या परीक्षेसाठी घेतलेले विषय बी. ए. भाग-३ साठी कायम राहतील

| | | |
|---|---|---|
| १) अर्थशास्त्र | २) समाजशास्त्र | ३) राज्यशास्त्र |
| ४) मराठी वाङ्मय | ५) भूगोल | ६) गृहअर्थशास्त्र |

# पदव्युत्तर अभ्यासक्रम एम. ए. (मराठी) भाग-१ व २

| **एम. ए. (मराठी) भाग–१ सत्र पहिले** | **विषय सांकेतांक** |
|---|---|
| आवश्यक पत्रिका १) मराठी वाङ्.मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (आरंभ ते १८१८) | २५०१ |
| आवश्यक पत्रिका २) साहित्य विचार | २५०२ |
| ऐच्छिक पत्रिका ३) लोकसाहित्य | २५०५ |
| ऐच्छिक पत्रिका ४) विशेष वाङ्.मय प्रकार कविता | २५०६ |

| **एम. ए. (मराठी) भाग–१ सत्र दुसरे** | **विषय सांकेतांक** |
|---|---|
| आवश्यक पत्रिका १) मराठी वाङ्.मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (१८१८ ते १९६०) | २५११ |
| आवश्यक पत्रिका २) समिक्षा विचार | २५१२ |
| ऐच्छिक पत्रिका ३) लोकसाहित्य | २५१५ |
| ऐच्छिक पत्रिका ४) विशेष वाङ्.मय प्रकार कादंबरी | २५१६ |

| **एम. ए. (मराठी) भाग–२ सत्र तिसरे** | **विषय सांकेतांक** |
|---|---|
| आवश्यक पत्रिका १) उपयोजित मराठी | २५२१ |
| आवश्यक पत्रिका २) भाषा विज्ञान | २५२२ |
| ऐच्छिक पत्रिका ३) विशेष ग्रंथकार | २५२३ |
| ऐच्छिक पत्रिका ४) ग्रामीण साहित्य | २५२६ |

| **एम. ए. (मराठी) भाग–२ सत्र चवथे** | **विषय सांकेतांक** |
|---|---|
| आवश्यक पत्रिका १) उपयोजित मराठी | २५३१ |
| आवश्यक पत्रिका २) भाषा विज्ञान | २५३२ |
| ऐच्छिक पत्रिका ३) भाषांतरित मराठी साहित्य | २५३५ |
| ऐच्छिक पत्रिका ४) आदिवासी साहित्य | २५३७ |

| **एम. ए. (गृहअर्थशास्त्र) भाग–१ व २ सत्र पहिले व दुसरे** | **विषय सांकेतांक** |
|---|---|
| 1. Family Resource Management | 2111 |
| 2. Human Development | 2112 |
| 3. Textile Clothing & Fashion Designing | 2113 |
| 4. Research Methodology & Computer Application | 2114 |

| **एम. ए. (गृहअर्थशास्त्र) भाग–२ सत्र पहिले व दुसरे** | **विषय सांकेतांक** |
|---|---|
| 1. Consumer Economics & Marketing | 3291 |
| 2. Food Science & Food Service Management | 3292 |
| 3. Extension Education & Communication | 3293 |
| 4. Marriage & Family Relationship | 3294 |

**सूचना :-**

वाङ्मय पारंगत (मराठी) भाग १ : परीक्षेसाठी अंतर्गत मूल्यमापनासाठी २० गुण राहतील. प्रत्येकी चार पत्रिका राहतील. प्रत्येक पत्रिका पूर्ण ८० गुणांची राहील.

वाङ्मय पारंगत (गृहअर्थशास्त्र) भाग-१ : परीक्षेसाठी प्रत्येकी चार पेपर राहतील. प्रत्येक पत्रिका पूर्ण ७५ गुणांची राहील. प्रत्येकी २५ गुणांचे प्रात्यक्षिक राहील.

शैक्षणिक सत्र २०१७-१८ पासून एम.ए. मराठी व गृहअर्थशास्त्रला विद्यापीठ नियमानुसार सेमिस्टर पद्धती लागू झालेली आहे. त्यानुसार परीक्षा घेण्यात येईल.

पीएच. डी. संशोधन केंद्र (मराठी व इंग्रजी) १. मराठी : ६ जागा २. इंग्रजी : ४ जागा

## ❖ प्रोत्साहनपर पुरस्कार

| गुणवत्ताप्राप्त विद्यार्थिनींना देण्यात येणारी पारितोषिके | | |
|---|---|---|
| १) | बी. ए. भाग-१ | पारितोषिक पदक |
| २) | बी. ए. भाग-२ | पारितोषिक पदक |
| ३) | बी. ए. भाग-३ | पारितोषिक पदक. |
| ४) | एम. ए.(मराठी) | पारितोषिक पदक |
| ५) | एम. ए.(गृहअर्थशास्त्र) | पारितोषिक पदक |
| ६) | राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार | पारितोषिक पदक |

## ❖ विभागनिहाय देण्यात येणारी पारितोषिके

| अ. क्र. | विभाग | वर्ग | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १) | भूगोल | बी. ए. भाग १,२,३ | रोख रक्कम |
| २) | अर्थशास्त्र | बी. ए. भाग ३ | रोख रक्कम |
| ३) | इंग्रजी | बी. ए. भाग ३ | रोख रक्कम |

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परीक्षा उन्हाळी वाङ्मय स्नातक (बी.ए.) व वाङ्मय पारंगत (एम.ए.) मध्ये गुणवत्ता यादीत आलेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे

## गुणवत्ता यादी

| अ. क्र. | नाव | वर्ग | वर्ष | गुणवता यादीतील |
|---|---|---|---|---|
| १ | कु.मनीषा अंबापुरे | वाङ्मय स्नातक | (बी.ए.) २०१० -११ | ७ वी |
| २ | कु.मनीषा गुल्हाने | वाङ्मय पारंगत | (एम.ए.)मराठी२०१०-११ | १० वी |
| ३ | कु.स्नेहा मिसाळकर | वाङ्मय स्नातक | (बी.ए.) २०१४-१५ | ५ वी |
| ४ | कु.रीता लादे | वाङ्मय स्नातक | (बी.ए.) २०१४-१५ | ७ वी |
| ५ | कु.रश्मी खेडकर | वाङ्मय स्नातक | (बी.ए.) २०१४-१५ | ८ वी |
| ६ | कु.पुनम शेंडे | वाङ्मय स्नातक | (बी.ए.) २०१४-१५ | ९ वी |
| ७ | कु.वंदना राठोड | वाङ्मय स्नातक | (बी.ए.) २०१५-१६ | ७ वी |
| ८ | कु.नेहा इंगळे | वाङ्मय पारंगत | (एम.ए.)गृह.अर्थ२०१५-१६ | ३ री |

## महाविद्यालयीन दिनक्रम

**✻ महाविद्यालयाची वेळ ✻**

**बी. ए. भाग–१,२ व ३**

वेळ- सकाळी ११.०० ते ५.३० पर्यत

शनिवार - सकाळी ८ ते १ पर्यंत

**पदव्युत्तर अभ्यासक्रम एम.ए. भाग १ व २ (मराठी व गृहअर्थशास्त्र)**

वेळ - सकाळी ११ ते ३

**✻ कार्यालयाची वेळ ✻**

**सकाळी १०.३० ते ५.३०**

# विविध पदांवर कार्यरत महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी

| | |
|---|---|
| कु. मोनाली इंगळे | साहाय्यक प्राध्यापक, श्रीराम महिला महाविद्यालय, धामनगांव रेल्वे. |
| कु. रश्मी तेलेवार | अप्पर कोषागार अधिकारी, नागपूर |
| कु. स्वाती दरणे | शिक्षिका, नेरपिंगळाई |
| कु. आरती तुमडाम | शिक्षिका, राजुरा |
| कु. रेखा इरपाते | शिक्षिका, सातेफळ |
| कु. रेखा साहारे | शिक्षिका, धारणी |
| कु. सुहास शेळके | शिक्षिका, चांदूर कन्या शाळा चांदूर रेल्वे |
| कु. लीना डाहे | शिक्षिका, धनोडी |
| कु. ज्योती पडोळे | शिक्षिका, सोनगांव |
| कु. अर्चना पांडे | शिक्षिका, दत्ता मेघे हायस्कूल, नागपूर |
| कु. अर्चना देशमुख | शिक्षिका, घुईखेड |
| कु. कांचन चव्हाण | यशदा, पुणे |
| कु. दर्शना काळे | एम.पी.एस.सी. परीक्षा पास (एम.ए.भाग २) |
| कु. शीतल खिरळकर | चांदुर रे. नगरपालिका नगराध्यक्षपदी निवड |
| कु. रीता लादे | जलसंपदा विभाग |
| कु. निवेदिता जेवडे | शा.आरोग्य सेविका, धोत्रा प्राथ. आरोग्य केंद्र |
| कु. नम्रता अतकरे | वकील |
| कु. अमृता बनसोड | वकील |
| कु. निशा शेवटिया | वकील |
| कु. मेघा मोहोड | लिपिक, कुंदन ग्लोबल इन्शुरन्स, पुणे |
| कु. वनमाला पारधी | साहाय्यक पोलीस निरीक्षक, वर्धा |
| कु. जीवनधारा नाखले | मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, चांदुर रेल्वे |
| कु. अंकिता इंगळे | शिक्षक सरस्वती प्राथमिक शाळा, चांदुर रेल्वे |
| कु. नेहा इंगळे | CHB अधिव्याख्याता, महिला महा. चांदुर रेल्वे |
| कु. रश्मी खेडकर | CHB अधिव्याख्याता, महिला महा. चांदुर रेल्वे |
| कु. नीलिमा टिचुकले | CHB अधिव्याख्याता, महिला महा. चांदुर रेल्वे |

# महाविद्यालयाचे नियम व शिस्त

महाराष्ट्र शासनाने व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या पत्रकानुसार महाविद्यालयीन विद्यार्थिनींना नियम व शिस्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१) माहितीपत्रकातील सर्व बाबींवरील नियमांचे अवलोकन करून त्याप्रमाणे त्याची पूर्तता करावी.

२) सूचना फलकावर लावलेल्या सूचनांचे आवर्जून पालन करावे.

३) महाविद्यालयीन विद्यार्थिनींची वर्तणूक महाविद्यालय परिसर तसेच बाहेर सुद्धा सौजन्यपूर्ण असावी. गैरवर्तन व बेशिस्त आढळल्यास संबंधित विद्यार्थिनींवर शिस्तभंगाची कार्यवाही करून महाविद्यालयातून निष्कासित करण्यात येईल.

४) महविद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या स्पर्धा व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनींचा सहभाग व उपस्थिती अनिवार्य राहील.

५) प्रत्येक विद्यार्थिनीने तिला मिळू शकणाऱ्या शिष्यवृत्तिबाबत जागृत असणे आवश्यक आहे.

६) गरीब व होतकरू विद्यार्थिनींना आवश्यकतेनुसार रीतसर अर्ज सादर केल्यास महाविद्यालयातर्फे आर्थिक मदत करण्यात येईल.

७) स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विशेष मार्गदर्शनाची सोय करण्यात येईल.

८) महाविद्यालयीन गणवेश अनिवार्य असल्यामुळे व विद्यार्थिनींना सोयीचे व्हावे याकरिता महाविद्यालयात गणवेश उपलब्ध करण्यात आले आहेत.

# Mahila Arts-Commerce College, Chandur-Rly.
## Various Committees

| |
|---|
| 1. N.A.A.C. Committee |
| 2. Staff Council |
| 3. College Prospectus & Academic Calenders Committee |
| 4. Admission Committee |
| 5. Discipline & Maintenance Committee |
| 6. Time Table & Workload Committee |
| 7. Student Council |
| 8. Student Counseling, Training & Placement Cell with Earn & Learn Scheme |
| 9. Library Committee |
| 10. Games & Sport with Gymkhana Committee |
| 11.U.G.C. Committee |
| 12. Conference & Seminar organization Committee |
| 13. N.S.S. & Prize Distribution Committee |
| 14. Garden & Nature Club |
| 15. Internal Assessment Committee |
| 16. Research Committee |
| 17. Student complaint with deterrence Committee |
| 18. News Publication Committee |
| 19. Alumni Association Steadier- Guardian Committee |
| 20. Purchasing Committee |
| 21. Educational & Industrial Tours Committee |
| 22. Study Circles |
| 23. Environmental Awareness & Disaster Management Committee |
| 24. Social welfare Committee |
| 25. Inter Colligates & Other different competition Committee |
| 26. Scholar ship Cell |
| 27. Internal Complaint with women cell |
| 28. Suggestion Box Committee |
| 29. Student development Committee |

# Sant Gadge Baba Amravati University

## Amravati University Admission Fees

| Particulars | B.A.I (A) | B.A.I (B) | B.A.II | B.A.III | M.A.I (Mar) | M.A.II (Mar) | M.A.I (HEC) | M.A.II (HEC) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. Admission Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 2. Students and Fund Fees | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 3. College Game & Sports Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 4. HEC Lab. Fees | 405 | 405 | 405 | 405 | 0 | 0 | 2665 | 2665 |
| 5. Gop. Lab Fees | 405 | 405 | 405 | 405 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6. Library Fees | 135 | 135 | 135 | 135 | 1330 | 1330 | 1330 | 1330 |
| 7. Identity Card Fees | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 8. Medical & Physical Fees | 45 | 45 | 45 | 45 | 45 | 45 | 45 | 45 |
| 9. Physical Efficiency Test Fees | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 10. College Exam Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 11. College Magazine Fees | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 |
| 12. Tution Fees | 800 | 2000 | 800 | 800 | 3000 | 3000 | 3000 | 3000 |
| 13. Extra C. A. Fees | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 7 | 70 | 70 |
| 14. Univ. Annual Fees | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 |
| 15. Univ. Student Conf. Fee | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 16. Univ. Stud. Wel Fund Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 17. Univ. Sport Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 18. Univ. Emergency Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 19. Univ. Enrollment Fees | 100 | 100 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 20. Univ. Sdu. Safety Ins. Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 21. Univ. I.S.U.M. (Ashwamegh) | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 22. Univ. Corpus Fund Fee | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 23. Sant Gadgebaba Adh. Nidhi | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 24. Environmental Studies Fee | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 25. Univ. Exam Fee | 330 | 330 | 330 | 330 | 305 | 305 | 305 | 305 |
| 26. Univ. Per Practical (ENQ. HEC) | 45 | 45 | 45 | 45 | 0 | 0 | 0 | 0 |
| 27. E. Suwidha Charges | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| TOTAL AMOUNT | 3026 | 4226 | 3076 | 2926 | 5446 | 5446 | 8111 | 8111 |